म. ग्रं. सं. ठाणे
विषय बु० प्र०
सं. क्र. ५०४

REFBK-0002010

# माझा मुंबईचा प्रवास

संपादक

## रामचंद्र जनार्दन गोखले, बी. ए.

प्रकाशक

केशव रावजी गोंधळेकर,

रावजी श्रीधर गोंधळेकर, यांचा बुकडेपो, बुधवार पेठ, पुणे.

REFBK-0002010

'जगद्धितेच्छु प्रेस', शनवार पेठ, ५०७ पुणे.

सन १९२१.

किंमत ४ आणे.

# माझा मुंबईचा प्रवास.

## उपोद्घात.


——:o:——

विसुकाकांचा बंड्या मुंबईला जाऊन आला होता. तो मुंबईच्या वाटेची व मुंबईची काय काय माहिती सांगे ! ती ऐकून आपण मुंबईला केव्हां जाऊं असें मला झालें होतें. बंड्या सांगे, "आगगाडी खंडाळ्याच्या घाटांतून जातांना 'कशासाठीं पोटासाठीं, खंडाळ्याच्या घाटासाठीं, भक् भक् भक् भक्' असें स्पष्ट बोलते." "अरे, आगगाडी बोलेल कशी?" म्हणून मी म्हणालों. तो म्हणाला "कशी बोलते तें मला माहीत नाहीं; पण असे शब्द ऐकूं येतात हें खास. तूं ऐकून तर पाहा, मी खोटें सांगतों कीं, काय?" बंड्या आणखी म्हणे "अरे, मुंबईची मजा काय म्हणून सांगूं. ओहो हो हो, केवढीं तीं घरें ! येथें शुक्रवार पेठेंत एका मारवाड्याचें पांच–मजली घर आहे, तें पाहून आपणाला आश्चर्य वाटतें, पण मुंबईंत चार–पांच–मजली घरें, शेंकडों नव्हेत हजारों, आहेत. एका इमारतींत पुष्कळ कुटुंबें रहावीं अशासाठीं पुष्कळ गाळे अथवा खोल्यांचे संच एका शेजारीं एक बांधलेले असतात, त्यांना चाळी म्हणतात. अशा तीन मजली, चार मजली टोलेजंग चाळी मुंबईस किती तरी आहेत !"

मुंबईच्या आणखी पुष्कळ मजा सांगून बंड्या म्हणे 'हें उत्तम बंदर असल्यामुळें जगांतील महत्त्वाच्या शहरांपैकीं एक आहे. येथें शेंकडों गिरण्या व कारखाने असून येथील व्यापारी व कारखानदार फार संपन्न आहेत. मुंबई बंदर अत्यंत प्रशस्त व सुरक्षित बंदरांपैकीं एक आहे. तें सर्व प्रकारच्या गलबतांनीं व सर्व देशांहून आलेल्या आगबोटींनीं नेहमीं गजबजलेलें असतें. या शहरांत जगांतील बहुतेक देशांतील लोक कमीजास्त प्रमाणानें आढळतात.' .... .... .... ....अशी **भूवर्णनांतील** माहिती लक्षांत राहण्यासाठीं मला पूर्वी ४।५ वेळां वाचावी लागली. पण मुंबईस या व इतर गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यामुळें, ही माहिती माझ्या ध्यानांत इतकी उत्तम राहिली आहे कीं, मी झोपेंत देखील बिनचूक सांगेन!" बंड्यानें सांगितलेली ही हकीगत ऐकून, आपण मुंबई केव्हां पाहूं असें मला झालें होतें. माझ्या बाबांना नेहमीं फिरण्याचें काम असे. आज मुंबईस, परवां नाशिकास, तर आणखी ४ दिवसांनीं धारवाडास असें त्यांना जाणें पडे. तेव्हां मीं मनांत ठरविलें कीं, आपल्या शाळेस दिवाळीची सुटी झाली कीं, 'मला बरोबर हिंडावयास न्या,' अशी बाबांना विनंती करावयाची. त्याप्रमाणें मीं केलें, व बाबांनीं माझी विनंती मान्य केली. त्याबरोबर मला किती आनंद झाला म्हणून सांगूं ! बंड्या मुंबईच्या प्रवासाची हकीकत सांगतो, तशी आपणासही लोकांना सांगतां यावी म्हणून आपल्या प्रवासाची हकीकत वहींत टिपून ठेवण्याचें मीं ठरविलें. मुंबईच्या प्रवासाची मला इतकी मजा वाटली कीं, त्यानंतर 'दुसरीं गांवेंही पाहण्यास मला बरोबर घेऊन चला' असें मी बाबांना म्हणालों व त्यांनींही मला बरोबर नेण्याचें कबूल केलें. याप्रमाणें त्यांच्या बरोबर मी गेलों व ४।५ वर्षें बराच प्रवास केला. या

प्रवासाची हकीकत मीं लिहून काढिली, व ती माझ्या मित्रांना दाखविली. ती वाचून त्यांना फार गंमत वाटली. अशीच गंमत इतर मुलांना वाटेल असें मला कित्येक मित्रांनीं सांगितलें, यास्तव, बालमित्रांनो, मी माझ्या प्रवासाची हकीकत तुम्हांपुढें ठेवीत आहें.

विद्याधर.




मुंबई म्युनिसिपालिटीचें ऑफिस.

# पुण्याहून मुंबईची वाट.

आम्ही पुण्याहून जी. आय. पी. रेल्वेच्या दोन प्रहराच्या गाडीनें निघालों. आगगाडीच्या रस्त्याच्या बाजूस तारायंत्राच्या खांबांवर मैल मांडलेले असतात, त्यांवरून पाहातां पांच मैल जाण्यास जी. आय. पी.च्या गाडीला ८ मिनिटें लागलीं असें दिसून आलें. अर्थात् गाडीचा वेग दर तासास ३०—४० मैल असावा असें कळून आलें. आमची गाडी बोरघाटांत रिव्हर्सिंग नांवाच्या स्टेशनावर थोडा वेळ थांबून चालूं लागली. तेव्हां पाहतों तों ती आलेल्या वाटेकडेच फिरून चालली असें दिसलें. गाडी परत कां चालली म्हणून विचारलें तों डब्यांतील एक गृहस्थ म्हणाले " घाटांतील एक बोगदा पडून रस्ता बंद झाला आहे म्हणून आगगाडी परत पुण्यास चालली आहे." हें ऐकून माझें मन फारच खट्टू झालें. तेव्हां बाबा म्हणाले " बाहेर डोकावून नीट पाहा; गाडी आलेल्या रस्त्यानें जाते, कीं निराळ्या रस्त्यानें ? " मी लक्षपूर्वक पाहिलें तों असें दिसलें कीं, गाडी उलट बाजूनें, पण आलेला रस्ता सोडून निराळ्याच रस्त्यानें, चालली होती. अशी कां चालली आहे असें बाबांना विचारलें, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, ह्या रिव्हर्सिंग स्टेशनाची जागा डोंगराचे टोंकाजवळ आहे. येथें आगगाडीच्या सडकेला ( असें मोठें वळण घेण्यास पुरेशी जागा नाहीं. आहे तेवढ्या जागेंत वळण घेतल्यास रस्त्यास बांक फार येईल व रस्त्यास उतारही फार येईल, व इतक्या

उताराच्या रस्त्यानें गाडी नेल्यास तिला इतका वेग येईल कीं ती आवरतां येणार नाहीं. यास्तव उतार कमी करण्यासाठीं या चिंचोळ्या व उतरत्या जागेंत< अशा प्रकारचें वळण घेतलें आहे.

रिव्हर्सिंग याचा इंग्रजींत अर्थ उलटणें; येथें गाडी उलट दिशेनें जाऊं लागते म्हणून यास रिव्हर्सिंग स्टेशन असें नांव ठेविलें आहे.



पुण्या-कडे. मुंबई-कडे.

वरील आकृतींत अ हें डोंगराचें टोंक होय. बपासून कपर्यंत तुटक रेषेनें दाखविल्याप्रमाणें रस्ता नेला, तर रस्त्यास बांक व उतार फार येईल, म्हणून रस्ता अपर्यंत नेऊन त्यास मुंबईकडला रस्ता जोडला आहे.

रिव्हर्सिंग स्टेशनापासून रस्ता एकसारखा उताराचा होता. वाटेनें एकापुढें एक असे अनेक बोगदे लागले. बोगद्यांत गाडी गेल्यावर 'कशासाठीं पोटासाठीं खंडाळ्याच्या घाटासाठीं, भक् भक् भक् भक्' म्हणून गाडी म्हणत असते, असें जें बंड्यानें

सांगितलें होतें त्याची आठवण झाली व पाहातों तों आगगाडीच्या आवाजांतून तसे शब्द थेट ऐकूं येऊं लागले. इतक्यांत शेजारचा एक मुलगा म्हणाला, "ही पाहा आगगाडी काय म्हणते. 'तुझ्या-साठीं तुझ्यासाठीं, माझ्यासाठीं कांहीं नाहीं." पाहिलें तों गाडीच्या आवाजांतून हेही शब्द ऐकूं येऊं लागले. फिरून 'कशासाठीं पोटासाठीं' हे शब्द ऐकूं येतात कीं काय हें पाहूं लागलों, तों तेही ऐकूं येऊं लागले! मग माझ्या लक्षांत आलें कीं, एंजिनाच्या चिमणींतून वाफ बाहेर पडतांना जो आवाज होतो तो नुसता भक् भक् भक् भक् असा असतो, व त्याच्या तालाशीं जुळणाऱ्या ज्या शब्दांची कल्पना करावी ते शब्द ऐकूं येतात. 'बसा, बसा, बसा, बसा,' असे शब्द निघतात अशी कल्पना करून ऐकूं लागलों तों तेही शब्द ऐकू येऊं लागले. बाबा म्हणाले, "यावरून थोडा बोध घेण्यासारखा आहे. तो असा कीं, केव्हां केव्हां आपली कल्पना आपणास फसविते व जें वास्तविक नाहीं तें आपणास आहेसें वाटूं लागतें. एकादा मनुष्य गर्विष्ठ आहे किंवा तो आपणास टोंचून बोलतो अशी आपली ठाम समजूत झाली, म्हणजे त्याच्या वागण्यांत व बोलण्यांत गर्विष्ठपणा व कुचकेपणा जेव्हां नसतो तेव्हांही तो आपणास आहेसा वाटतो. यासाठीं जें काय मानणें तें पूर्वींच मनाचा समज ठाम ठरवून न मानतां, नीट पाहून जसें दिसेल तसेंच मानावें."

## बोरघाट अथवा खंडाळ्याचा घाट.


असो. खंडाळ्याचे घाटांत दाट जंगलानें आच्छादलेल्या सह्या-द्रीचा देखावा फार भव्य व मनोहर दिसला. पावसाळ्यांत तर तेथील देखावा फारच बहारीचा दिसतो. पर्वतावरून वाहणारे

पाण्याचे बर्फासारखे शुभ्र प्रवाह 'गिरिराजानें घातलेल्या पुष्पहारांप्रमाणें सुंदर दिसतात,' असें जें वर्णन एका कवीनें केलें आहे त्याचा खरेपणा त्या वेळीं दिसून येतो.

रिव्हर्सिंग स्टेशनापासून आगगाडीच्या रस्त्याला जो उतार लागला तो कर्जतच्या अलीकडच्या पळसदरी स्टेशनापर्यंत चालू होता. एवढ्या उतारांत गाडी अठराशें फूट खालीं उतरली. यावरून घाटाखालचा प्रदेश पुण्यापेक्षां सखल आहे असें दिसतें. वाटेनें २९ । ३० बोगदे लागले. त्यांपैकीं सर्वांत मोठा सुमारें पाव मैल लांबीचा होता. हा बोरघाट अथवा खंडाळ्याचा घाट उतरतांना माझ्या लक्षांत आलें कीं, नदीच्या घाटास जसा उतार असतो; तसा येथें वाटेस उतार आहे, म्हणून यास घाट म्हणतात. घाट उतरल्यावर कोंकणाचा प्रदेश लागला. या प्रदेशांत सर्वत्र दिस णारी विशेष गोष्ट म्हणजे ताड व माड ( नारळ ) यांचीं झाडें. आमची गाडी कुर्ला स्टेशनला पोहोंचली तेव्हां बाबांनीं सांगितलें "आतां येथून मुंबई लागली." पाहतों तों थोड्या अंतरावर गिरण्यांच्या उंचच्या उंच चिमण्या ऊर्फ धुराडीं दिसूं लागलीं. मी म्हणालों " किती ह्या चिमण्या " बाबा म्हणाले " ह्या कांहींच नाहींत, अशा शेंकडों चिमण्या येथें आहेत.

मुंबई हे गिरण्यांच्या धुराड्यांचें एक जंगलच आहे."


दादर स्टेशनला गाडी गेल्यावर पुढें कांहीं अडचणीमुळें आगगाडीचा रस्ता खुला नसल्यानें आमची गाडी त्या स्टेशनवर बराच वेळ थांबली व त्यामुळें कंटाळून मला झोंप लागली. बोरीबंदर स्टेशन येतांच मला बाबांनीं जागें केलें व आम्ही आगगाडींतून उतरून एका व्हिक्टोरियांत जाऊन बसलों. ( मुंबईस ज्या चार-



चाकी घोड्याच्या गाड्या आहेत त्यांना व्हिक्टोरिया म्हणतात.) या वेळीं रात्रीचे सुमारें ७॥ वाजले होते.

## बोरीबंदर.

स्टेशनाबाहेर आल्यावर बोरीबंदर स्टेशनाबाहेरील जो भव्य देखावा दृष्टीस पडला त्याचें काय वर्णन करावें. जिकडे पाहावें तिकडे उंचच्या उंच टोलेजंग इमारती, विजेच्या व गॅसच्या दिव्यांचा लखलखाट, आणि गाड्या व माणसें यांची गर्दीच गर्दी ! हा देखावा पाहून कादंबरींत वार्णिलेलें एकादें शहर मी स्वप्नांत पाहात आहें कीं काय असें मला वाटलें. अहाहा ! किती भव्य व मनोहर देखावा ! ते बोरीबंदरजवळचे कांहीं किंचित् निळ्या, तर कांहीं किंचित् तांबूस रंगाचे विजेचे दिवे, डोक्यावर जिकडे तिकडे दिसणारें विजेच्या तारांचें जाळें, एंजिन अथवा घोडे यां-



बोरीबंदर.

वांचून जणू काय जादूनें चालणाऱ्या *ट्रामगाड्या, मधून आवाज न करितां भुतांप्रमाणें वायुवेगानें जाणाऱ्या मोटारी, नानातऱ्हेचे पोषाक केलेले नाना जातीचे लोक या सर्वांचा एकाच वेळीं दिसणारा देखावा पाहून मला मुंबई केवळ स्वर्गाप्रमाणें भासूं लागली. ही मजा पाहण्यांत मी गर्क झालों आहें तों आम्हांस जेथें उतरावयाचें होतें तें

---


* रुळावरून घोडे किंवा वीज यांच्या शक्तीनें चालणाऱ्या गाड्या प्रथम आउट्राम नांवाच्या गृहस्थानें सुरू केल्या. त्याच्या नांवावरून अशा गाड्यांना ट्रामगाड्या हें नांव पडलें.

## सरदारगृह

आलें. जेथें जेवण्याची व राहण्याची चांगली सोय होते, अशी सरदारगृह ही मुंबईतील एक उच्च प्रकारची खाणावळ ( इंग्रजींत होटेल ) आहे येथें आम्हाला राहण्यास खोली दिली होती, तिचें भाडें दोन रुपये पडेल असें जेव्हां मीं ऐकिलें, तेव्हां बाबांना विचारलें "आपण येथें एक आठवडाच राहणार, तेवढ्यासाठीं दोन रुपये भाडें ? कीं हें महिन्याचें भाडें ?" बाबा म्हणाले, "हा वेड्या, हें भाडें आठवड्याचें नव्हे, रोजचें ! या शहरीं अगदीं भिकार खोलीलाही १।८ रुपयापेक्षां कमी भाडें पडत नाहीं. त्यांतून ही खोली मोठी, चांगली सुशोभित व हवाशीर आहे म्हणून व आपणांसारखे उतारू आले नाहींत तर या खोलीचें भाडें मालकास कधीं कधीं मुळींच मिळत नाहीं म्हणून उतारू-पासून मालकास इतकें भाडें घ्यावें लागतें.

## मुंबई बेट.

येथें जागेला भाडें किती पडतें याची मुंबईपासून दूर राहा-णाऱ्या माणसांना कल्पनाही व्हावयाची नाहीं. विशेष रहदारीच्या ठिकाणीं जागा असेल, तर एका मोठ्या खोलीस महिन्याला ३० रुपये भाडें पडतें. क्राफर्ड मार्केटजवळ दोन खणाचे दुकानास महिना शेंदोनशें रुपये भाडें द्यावें लागतें. मुंबई हें बेट असल्या-मुळे येथें जागा अगदीं मोजकी आहे. येथें जागेच्या मानानें घरें बांधूं इच्छिणारे लोक फार, म्हणून जागेला विलक्षण किंमत पडते. कांहीं ठिकाणीं दोन खणांएवढी जमीन विकत घ्यावयास ३।४ हजार रुपये द्यावे लागतात म्हणजे एका रुपयाला एका रुपयाच्या नोटीखालीं मावेल एवढी जागाही पुरती मिळत नाहीं ! जागेला




मुंबई बंदर.

किंमत फार म्हणून घरास भाडें फार पडतें. यामुळें बहुतेक लोक स्वयंपाक करण्यास व रात्रीं निजण्यास पुरेल एवढीच जागा घेऊन राहतात. येथें कोणाकडे पाहुणा आल्यास त्याला निजण्यास जागा देण्याची मोठी अडचण पडते. म्हणून मुंबईस राहणारे लोक म्हणतात, 'एखादा पाहुणा नुसता जेवावयास आलेला पुरवेल, पण नुसता राहण्यास आलेला खपणार नाहीं.'

मजुरी करण्यास गेलेले गरीब लोक जागेच्या अडचणीमुळें दुकानापुढील पडव्यांतून निजतातच, पण कित्येक लोक बिनबरसातीच्या दिवसांत रस्त्यावर गटाराशेजारींही निजतात."

## जिकडे तिकडे गुजराथी.

मुंबईस गेल्यावर एक गोष्ट नजरेला आली ती ही कीं; मला वाटत होतें त्याप्रमाणें हें शहर मराठ्यांचें म्हणजे मराठी भाषा बोलणारांचें मुख्यतः नसून गुजराथी भाषा बोलणाऱ्या लोकांचें मुख्यतः आहे. मुंबईस *मराठे लोक बरेच आहेत तरी भाटे,गुजराथी, पार्शी यांचा भरणा व्यापारी, अधिकारी वगैरे वजनदार लोकांत विशेष आहे. मुंबई शहराची मुख्य भाषा गुजराथी आहे. म्हणूनच मुंबईस गुजराथी फार ऐकूं येतें. गिरगांव हा ब्राह्मणवस्तीचा भाग सोडला, तर इतर भागांत मुख्य भाषा गुजराथीच दृष्टीस पडते. 'खारा पिस्ता, खारा बदाम,'(अर्थ-खारे पिस्ते, खारे बदाम,) 'सेंगाचिनाय (शेंग चिनी म्हणजे भुईमुगाच्या शेंगा) डुढिओ डुढिओ' (पैसा),'सांज वर्तमान बे डुढिओ' (सांज वर्तमानपत्राचा अंक दोन पैसे), 'पाणीनो माटलो' ( पाण्याचा माठ ), 'ग्यासलेटनो डबो, तीन रुपिया बे आना' ( तीन रुपये दोन आण्यांला राकेलचा डबा ), वगैरे फेरीवाल्या लोकांचे बोल व दुकानांतून 'क्या जुईए' ( काय पाहिजे ? ) 'आवो शेट' ( या महाराज ), 'सबूर' ( थांबा ), 'साहेबजी' (नमस्कार) वगैरे शब्द फार ऐकूं येतात.

## मुंबईंत हिंडण्यासाठीं गाड्यांची सोय

फार चांगली आहे. व्हिक्टोरिया पुष्कळ आहेतच, पण त्यांतून हिंडण्यास भाडें मैलीं कमींत कमी आठ आणे पडतें. तें सामान्य लोकांस कसें देतां येणार ? त्यांच्या सोईसाठीं येथें आगगाड्या व ट्रामगाड्या आहेत.

---

* मराठे म्हणजे महाराष्ट्रीय अथवा मराठी भाषा बोलणारे.

ट्रामगाडींतून मुंबईच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जाण्यास भाडें अवघें दीडआणा पडतें. आगगाडींतून भिन्न भिन्न नियमित ठिकाणींच जातां येतें, पण ट्रामनें शहराच्या बहुतेक भागांत जातां येतें. पूर्वी उतारूस ट्रामगाडी वाटेल तेथें थांबवितां येत असे, पण आतां तिर्थी सुमारें फर्लांगाच्या अंतरावर स्टेशनें केलीं आहेत व त्या स्टेशनांच्या जागींच ट्राम थांबते. हीं स्टेशनें कळण्यासाठीं वाटेनें खांबांना 'येथें गाडी थांबते' अशा पाट्या लावल्या आहेत. अशा स्टेशनाजवळ गाडी थांबली म्हणजे चढून बसावें किंवा उतरावें. ट्राम-गाडींत गाडीच्या डाव्या बाजूनें (गाडी जिकडे जाते तिकडे गाडीचें तोंड आहे असें समजतात) चढावें. उजव्या बाजूनें चढून फळीवर पाय ठेवून उभें राहिल्यास समोरून उजव्याबाजूनें येणाऱ्या ट्रामगाडीचा धक्का लागण्याचा संभव असतो. ट्रामच्या मागील दरवाज्यानें आंत चढावें व पुढील दरवाज्यानें उतरावें. ट्राम-मधून उतरतांना ट्राम जिकडे जात असेल तिकडे तोंड करूनच उतरावें. ट्राम चालत असतांना उलट बाजूस तोंड करून उतरल्यास ट्रामच्या वेगामुळें डोक्याचा झोंक मागें जाऊन मनुष्य पडून डोक्याचा मागला भाग जमिनीवर आपटण्याची भीति असते. गैर-माहितगार माणसाकडून अशा चुका झाल्याचीं व त्यामुळें अपघात झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. मुंबईस नव्यानें जाणारा मनुष्य ट्राममध्यें बसल्यावर कधीं कधीं इतर लोकांच्या तोंडाकडे एक-सारखा पाहात राहातो. दुसऱ्याच्या तोंडाकडे टक लावून पाहाणें असभ्यपणाचें समजलें जातें, यास्तव तसें करूं नये. माझ्यासमोर ट्राममध्यें बसलेल्या एका युरोपियनानें पालथ्या कवडीच्या आका-राची टोपी घातली होती. ती चमत्कारिक दिसणारी टोपी पाहून मला आश्चर्य वाटलें. म्हणून मी त्या गृहस्थाच्या तोंडाकडे बराच

वेळ पाहात राहिलों, तों त्यानें मला विचारलें, ' डू आय् ओ यू एनि थिंग' ( मी तुमचें कांहीं देणें आहे काय ? ) ? देणें चुकवून पळून गेलेल्या देणेकऱ्याला पकडण्यासाठीं आपण उत्सुक असतों, म्हणून एखादा इसम तो देणेकरी आहे अशी आपणास शंका आली, अथवा त्यानें कांहीं गुन्हा केला आहे, असें आपणास वाटलें, म्हणजे आपण त्याच्या तोंडाकडे पाहातों. या गोष्टीस अनुलक्षून त्या गृहस्थाचें भाषण होतें. मला त्या गृहस्थाचें बोलणें समजलें नाहीं. पण त्याचा अर्थ बाबांनीं मला समजावून सांगितल्यावर मला सर्व कळून आलें व त्यानंतर मी सावधगिरीनें वागूं लागलों.

## लोकल ट्रेन्स (स्थानिक आगगाड्या ).

मुंबईतील लोकांच्या सोयीसाठीं मुंबई व ठाणें आणि कल्याण यांच्या दरम्यान जी. आय्. पी. रेल्वेच्या आगगाड्या सारख्या जात येत असतात. बहुधा दर अर्ध्या तासास गाड्या असतात. या आगगाड्यांचा जो रस्ता मुंबई शहरांत दाट वस्तीच्या भागांतून गेला आहे, त्याला पाऊण--एक मैलावर स्टेशनें आहेत. भाडें दर मैलीं सुमारें एक पैसा असतें. मात्र एका स्टेशनापासून दुसऱ्या स्टेशना-पर्यंत भाडें अर्ध्या आण्यापेक्षां कमी नसतें. या मुंबईशहरापुरत्या ज्या आगगाड्या आहेत, त्यांना लोकल ट्रेन्स हें ( स्थानिक गाड्या अशा अर्थाचें ) नांव आहे. अशाच गाड्या मुंबई व वांद्रें याच्या दरम्यान १५—१५ मिनिटांनीं बी. बी.सी.आय्. रेल्वेच्या चालू असतात. या गाड्यांतून नेहमीं जाणारांना फार थोड्या पैशांत महिन्याचें, तीन महिन्यांचे, सहा महिन्यांचे असे पास मिळतात. अशा लोकांना दहा पांच मैलांवर कमी गर्दीच्या जागीं व कमी भाड्या-च्या घरांत राहून मुंबईस रोज आण्यादीड आण्याच्या खर्चानें

जातां येतें. मुंबईस लांबलांबच्या ऑफिसांत, कारखान्यांत व गिरण्यांत काम करणाऱ्या लोकांना या स्थानिक आगगाड्यांपासून फार सोय होते.

## मुंबई सर्व जगांतील लोकांचें प्रदर्शन.

मुंबईस गेल्यावर दुसऱ्या दिवशीं ट्रामगाडींत बसून परेळ लेबॉरेटरी पाहाण्यास निघालों. ट्राममध्यें व वाटेंत पाहिलें तों किती तरी



रजपूत.



ब्रह्मी.




सिंधी.



काठेवाडी.



भाटिया.



सिंहली.



मद्रासी.

१७



इराणी.



अरब.

प्रकारचीं माणसें माझ्या दृष्टीस पडलीं. मुंबईशहर हिंदुस्तानांतील नव्हे तर बहुतेक पृथ्वींतील सर्व जातींच्या माणसांचें प्रदर्शन आहे, असें जें म्हणतात त्याचा अनुभव आला. मुंबईला आम्ही ७।८ दिवस होतों तेवढ्यांत जेथें तेथें दृष्टीस पडणाऱ्या रोवळीवजा टोपी घालणाऱ्या पारशांशिवाय, डोकी-भोंवतीं गोंड्यागोंडयांची काळी दोरी बांधणारा अरब, केसाळ टोपीचा इराणी, बारक्या डो-ळयाचा चिनी, तुंदिलतनु (मोठ्या पोटाचा ) बनिया, जाड ओ-ठाचा काळाकुट्ट शिद्दी, उंच पुर-भऱ्या, दाढीवाला शीख, बोडका बंगाली, मोठीशेंडीवाला मद्रासी, वगैरे किती तरी निरनिराळे लोक पाहिले. यांशिवाय जार्जियन, आर्मिनियन, यहुदी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, अमेरिकन वगैरे लोकही मुंबईंत आहेत. मुंबईंत निरनिराळ्या ८० भिन्न जातींचे लोक आहेत असें सांगतात. फक्त मुंबईंत आढळून येणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या लोकांच्या पग-ड्यांचीच गणना केली तर ती सत्तरांवर भरते ! मुंबईस इतक्या



काश्मिरी ब्राह्मण.

भिन्न जातींच्या लोकांचा परस्परांशीं संबंध येत असल्यामुळें परधर्मी मनुष्याशीं सलोख्यानें वागण्याचा गुण मुंबईत राहणाऱ्या माणसांमध्यें बराच आला आहे. मुंबईइतका भेदाभाव (भेद न मानणें) इतरत्र क्वचितच नजरेस



कच्छी.



पारशी.

पडतो. कुलाब्यास बँड स्टँड आहे तेथें शुक्रवारीं लष्करी बँड वाजत असतो. त्या ठिकाणीं युरोपियन व हिंदी लोक एकमेकांत अगदीं मिसळून चालतात. कलकत्ता शहर मुंबईच्या आधीं सुधारलेलें व तेथें सुशिक्षित, श्रीमान् बंगाली पुष्कळ आहेत,


पण तेथें ईडन बागेंत बँडजवळ युरोपियन व हिंदी लोकांकरितां अगदीं निरनिराळ्या जागा आहेत; अर्थात् युरोपियन व हिंदी लोक तेथें एकमेकांत मिसळत नाहींत असें मला बाबांनीं सांगितलें. असो.

## परेळ लेबॉरेटरी.

आम्हीं परेळ लेबॉरेटरीला पोंचल्यावर बाबांनीं तेथील मुख्य डाक्टरांची परवानगी मागितली, व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें दिली. लेबॉरेटरी म्हणजे प्रयोगशाळा; याठिकाणीं सूक्ष्म जंतूंपासून होणाऱ्या रोगांवरील औषधांसंबंधानें (विशेषतः प्लेगसंबंधानें) प्रयोग करितात, म्हणून यास लेबॉरेटरी म्हणतात. या लेबॉरेटरींतील सर्व अधिकारी फारच सभ्य आहेत व ते सर्व गोष्टी मोठ्या आस्थेनें दाखवितात. येथें आम्हांस प्लेगची लस कशी तयार करितात तें प्रथम दाखविलें. नंतर नारू, डास व सर्प यांसंबंधानें प्रयोग चालले होते ते दाखविले येथें अनेक प्रकारचे विषारी व बिन विषारी साप ठेविले आहेत. ते पाहून आम्हाला फारच मौज वाटली. नागाचे विषावर औषधी उपाय शोधून काढण्यासाठीं जें नागाचें विष लागत असतें तें आमच्या देखत जेव्हां काढलें तेव्हां आम्हांस फारच मजा वाटली. एक



मोठा थोरला नाग पिंजऱ्यांतून जमिनीवर सोडला. लागलचि एका मनुष्यानें दुबेळकें असलेलें काठीचें टोंक, दुबेळक्या-खालीं पाठ येईल अशा रीतीनें, नागाचे पाठीवर टेकलें व दुसऱ्या हातानें नागाची मान धरिली. नंतर त्या नागापुढें, तोंडास फडकें बांधलेला एक कांचेचा पेला धरला, त्याबरोबर तो त्या पेल्यास चावला. तेव्हां नागाचे दांत पेल्यावरील फडक्यांत शिरून त्यांतून विष मधाप्रमाणें फडक्यावर गळलें व त्यांतून तें खालच्या पेल्यांत उतरलें. (वरील आकृति पाहा.)




हिंदुस्तानांतील लोकांचा संहार कर-ण्यास जणू काय अवतार घेतलेल्या प्लेग-रूपी राक्षसापासून लशीच्या योगानें प्राण वांचविण्याचें महापुण्याचें काम ही लॅबोरे-टरी करीत आहे, हा विचार मनांत येऊन ह्या संस्थेविषयीं आम्हास फार कौतुक व आदर वाटला. प्लेगचा प्रतिबंध करणारी लस प्रोफेसर हाफकिन नांवाच्या एका रशियन डॉक्टरांनीं शोधून काढिली. ह्या विद्वान डॉक्टरांचे व ही लस तयार करून देणाऱ्या सरकारचे लोकांवर केवढे उपकार आहेत बरें ?

## राणीचा बाग.

नंतर आम्ही राणीचा बाग पाहाण्यास गेलों. मुंबई शहर हें ज्याप्रमाणें जगांतील माणसांचें प्रदर्शन, त्याप्रमाणें राणीचा बाग जगांतील पशु, पक्षी, वनस्पति व कारागिरी यांचें प्रदर्शन आहे.

ह्या बागेचा विस्तार ९८ एकर म्हणजे एखाद्या खेडेगांवापेक्षां जास्त आहे. यांत वनस्पतींचे दोन हजारांहून जास्त प्रकार असून निरनिराळे ५१६ शें प्राणी आहेत. यांपैकीं पुढील प्राणी पाहून आम्हांस विशेष मजा वाटली. अनेक प्रकारचीं माकडें, अनेक प्रकारच्या चित्रविचित्र रंगांच्या चिमण्या व पोपट, कंबरेइतके उंच व लांब चोंचीचे करढोक, क्रौंच वगैरे पक्षी; कोल्हा, खोकड, लांडगा, तरस, चित्ता, वाघ, अस्वल, सिंह वगैरे हिंस्र पशु, अनेक प्रकारचीं हरणें, भल्या मोठ्या धोंड्याएवढीं डोंगरी कांसवें, शिवाय लामा, कांगरू, सुसर, सायाळ वगैरे जनावरें येथें एक म्हातारा पंचरंगी राघू होता, त्यास कांहीं वात्रट




सिंह.

मुलें 'हात साल्या' म्हणून शिवी देत, व तीच शिवी तो पोपट परत मुलांस देई. पोपटास ही शिवी आहे असें समजत नाहीं व तो केवळ ऐकलेलेंच उलट बोलतो, पण यावरून फार चांगला बोध घेण्यासारखा आहे. तो हा कीं, हें जग कांहीं अंशीं या पोपटाप्रमाणें आहे. जें आपण त्याला द्यावें, तें परत आपणास मिळतें. लोकांस शिव्या दिल्या तर आपणास शिव्या मिळतात, व आपण ममतेनें बोललों तर आपणास परत ममतेचे शब्द मिळतात.

येथें येणारे कांहीं लोक येथील प्राण्यांना निष्कारण त्रास देतात, हें पाहून फार वाईट वाटलें. आधींच ते प्राणी बंदिवासांत. जेवढें घालावें तेवढेंच त्यांना खायला मिळणार. आखून दिलेल्या जागे-

बाहेर पाऊल टाकण्याची सोय नाहीं. अशा स्थितींत त्यांस त्रास देणें ही फार लाजिरवाणी गोष्ट आहे. गंमत पाहावयाची हाच



काळवीट.

हेतु असेल तर त्यांस थोडें खावयास दिल्यानेंही तो हेतु साध्य होतो. खावयास देणाऱ्या माणसावर जनावरें काय प्रेम करतात ! कोण त्यांची कृतज्ञता ! नेहमी खावयास घालणाऱ्या मनुष्यानें कुत्र्यास काठी मारली तर कुत्रा ती काठी चाटतो, व फार संतापला तर काठीस चावतो, पण मारणाऱ्या माणसास कांहींही इजा करीत नाहीं ! इतकी कृतज्ञता पशुपक्ष्यांमध्यें वसत असतां, बांदिवासांत ठेवलेल्या प्राण्यांना निष्कारण त्रास द्यावयाचा ही किती शरमेची गोष्ट आहे बरें ? प्राण्यांस निष्कारण त्रास देणाऱ्या माझ्या बंधूंनीं याचा विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

ह्या बागेसाठीं दरवर्षीं सुमारें एक लाख रुपयांचा खर्च होत असतो !

## बॅकबे.

संध्याकाळीं आम्ही बॅकबेवर फिरावयास गेलों. बॅक म्हणजे पाठ, बे म्हणजे उपसागर; अपॉलो बंदराकडे तोंड केलें असतां हा उपसागर पाठीकडे येतो म्हणून यास बॅकबे म्हणतात, असें वाटतें. येथें सूर्यास्ताचे वेळीं देखावा फार मनोहर दिसतो. समोर समुद्राचें हिरव्या निळ्या रंगाचें अफाट पाणी, वर अस्तास जाणाऱ्या

सूर्याच्या प्रकाशामुळें सोन्याच्या रसाचा सडा घातल्याप्रमाणें शोभायमान दिसणारें पश्चिमेकडील आकाश, व दरम्यान वरील सूर्यप्रकाशाचें पाण्यांत दिसणारें प्रतिबिंब या सर्वांची शोभा पहात असतां मन तल्लीन होऊन जातें.

## उदधीचें उग्र स्वरूप.

शांत असतांना समुद्र जितका मनोहर दिसतो, तितकाच तो क्षुब्ध असतांना उग्र दिसतो. समुद्र खवळतो तेव्हां नुकसानही भयंकर होतें. वादळानें होणाऱ्या नासाडीचें वर्णन 'मुंबईचें वर्णन' या पुस्तकांत पुढें लिहिल्याप्रमाणें आढळतें.

" सन १८३७ जून महिन्याच्या पंधराव्या तारखेस मुंबई येथें एक मोठें भयंकर वादळ झालें. त्या दिवशीं शहरांतील सरकारी ऑफिसें, कारखाने, हीं सर्व बंद होतीं. एक सगळा दिवस शहरांत कांहींच उलाढाल झाली नाहीं. सतत पावसाच्या धारा लागल्या होत्या व मोठा प्रचंड वायु सुटला होता. तेणेंकरून कित्येक घरें कोसळलीं, हजारों वृक्ष उलथून पडले व शेंकडो जहाजें फुटून गेलीं. कित्येक तिरकटी तारवें बंदरोबंदरीं येऊन पडलीं होतीं आणि पुष्कळ लोक जखमीही झाले. लाखों रुपयांचा माल मुंबईच्या आखातांत पसरून गेला होता. कोटांत जिकडे तिकडे हातहात पाणी भरून गेलें होतें. त्या दिवशीं मुंबई केवळ म्लान होऊन गेली ! असें सांगतात कीं या प्रसंगीं सुमारें ३० लक्ष रुपयांचा नाश झाला.

असेंच एक दुसरें तुफान १८९१ त नोव्हेंबर महिन्याचे पहिल्या तारखेस झालें होतें:—

या वादळामुळें मुंबई बंदरांत दोनशें अडीचशें मनुष्यें बुडून मेलीं व सुमारें २०० जहाजें फुटलीं. त्यांतील मालासुद्धां सर्व नासाडी

झाली, तिचा आकार ३० लक्ष रुपये केला आहे. या शहरांतील दुसऱ्या मालमत्तेची नासाडी झाली ती खेरीजच. हजारों माड पडले, घरें कोसळलीं व वखारींतील माल नासून गेला. या प्रसंगीं मुंबईस सुमारें अर्धकोट रुपयांचा धक्का बसला असावा. मुंबईचे सगळे खाडींत अनेक तऱ्हेचा माल पसरून गेला होता. गरीब लोक बंदरांतून टोपल्यांच्या टोपल्या तांदूळ, गहूं, बाजरी व इतर दाणा, सडलेलें खोबरें आणि कापूस वगैरे जिन्नस आणून उन्हांत वाळवून ठेवीत"

## जे. जे. हॉस्पिटल.

तिसरे दिवशीं जे. जे. हॉस्पिटल व ग्रँट मेडिकल कॉलेज पाहाण्यास गेलों. डॉक्टरींचें शिक्षण देणाऱ्या कॉलेजास जोडून इस्पितळ लागतें म्हणून या दोन्ही संस्था मिळून एकच संस्था आहे. ही संस्था म्हणजे एक लहानसें गांव आहे. कारण हिचा विस्तार शेंपन्नास एकर असून हींत सुमारें ४० इमारती आहेत; पैकीं १९ फार मोठ्या आहेत या इास्पेतळांत नेहमीं चारपांचशें रोगी असतात व कॉलेजांतील विद्यार्थी व नौकर मिळून हजारांवर माणसें येथें राहतात. येथें दररोज सुमारें शंभर रोगी येतात व रोज १०।२० ऑपरेशन्स ( शस्त्रक्रिया ) होतात. येथें लहानमोठे मिळून पाउणशें डॉक्टर, दीडशें नर्सेस, वीस कंपौंडर, चाळीस कारकून व तीनशें गडीमाणसें आहेत. येथील वर्षाचा खर्च चार पांच लाख असावा. मुंबईचे प्रसिद्ध दानशूर पारशी व्यापारी जमशेटजी जिजीभाई बाटलीवाले यांनीं येथील इस्पितळ बांधण्यास पावणे दोन लाख रुपये दिले. जमशेटजी जिजीभाई या नांवांतील पहिलीं इंग्रजी अक्षरें जे. जे. यांवरून यास जे. जे. हॉस्पिटल हें नांव पडलें. या कॉलेजांतील कांहीं गोष्टी विशेष पाहण्यासारख्या आहेत; उ०, येथील पदार्थसंग्र-

हालय. यांत अनेक प्रकारचे गर्भ, शरीराचे कापलेले रोगग्रस्त भाग, मुतखडे वगैरे ठेविलेले असून शरीराच्या अवयवांची रचना व अवयवांची रोगग्रस्त स्थिति समजावी म्हणून शाडू अथवा मेण यांचे केलेले नमुने ठेविलेले आहेत. हा संग्रह नीट पाहिला तर एकाद्यास वैद्यशास्त्राचें बरेंच ज्ञान होईल. ह्या संग्रहांतील वस्तूंपैकीं पुढील दोन गोष्टी आम्हांस विशेष मनोरजक वाटल्याः—( १ ) गर्भाशयांत असलेलीं जुळीं व तिळीं मुलें व ( २ ) मोठमोठे मुतखडे. एका मुतखड्याचे तुकडे ठेविले आहेत, त्या सर्वांचें मिळून वजन सुमारें दीड शेर आहे. एवढा मुतखडा जगांत कोठेंही सांपडला नाहीं, असें म्हणतात. सिंध प्रांतामधील एका रोग्याचे पोटांतून हा मुतखडा काढला. हा मुतखडा एवढा मोठा आहे अशी कल्पना प्रथम न झाल्यामुळें मुतखडा फोडण्यासाठीं जें शस्त्र आंत घातलें होतें तें, खडा फोडण्यासाठीं चिमटा दाबला तेव्हां, मोडून गेलें. सर्वांत मोठ्या शस्त्राचा उपयोग होईना तेव्हां पोट फाडून मुतखडा काढला. ही शस्त्रक्रिया करण्यास ४॥ तास लागले यामुळें, व जखम मोठी करावी लागली यामुळें, रोगी दुसऱ्या दिवशीं मेला. हा मुतखडा केवढा मोठा व कशा प्रकारचा आहे हें आधीं कळलें असतें तर रोगी बहुधा दगावला नसता. हें आधीं कळण्याचें साधन अलीकडे उपलब्ध झालें आहे. हें साधन क्ष–किरण हें होय. यांच्या साहाय्यानें शरीरांतील हाडें किंवा इतर अपारदर्शक पदार्थ दिसतात, व त्यांचा फोटो घेतां येतो. मुतखडा, अंगांत गेलेली बंदुकीची गोळी, मोडलेलें हाड हीं कोठें आहेत,

कशा स्थितींत आहेत याचें उत्तम ज्ञान क्ष—किरणांच्या योगानें होतें. या किरणांचें उत्तम प्रकारचें यंत्र येथें ठेविलें आहे. त्याची किंमत ३५ हजार रुपये आहे.* पदार्थसंग्रहालयांतील त्वचेच्या रोगांचे कांहीं नमुने इतके हुबेहूब आहेत कीं, पुतळ्यांच्या अंगावरील फोड व त्यांतून निघणारा पू हीं ( यांचें मेणाचें चित्र ) पाहून कांहीं लोक त्यांची घाण नाकांत शिरेल या भीतीनें नाकाला हातरुमाल लावितात !

या कॉलेजांतील पाहण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे प्रेतें फाडण्याची जागा. शरीररचना कशी आहे हें वैद्यकीचा धंदा करणाऱ्यास समजणें आवश्यक आहे. यास्तव इस्पितळांत येणाऱ्या भिकारी अथवा बिनवारशी रोग्यांपैकीं जे रोगी मरतात व अर्थात् ज्यांचीं प्रेतें नेण्यास कोणी स्नेही किंवा नातेवाईक येत नाहींत, त्यांचीं प्रेतें विद्यार्थ्यांना देतात, व ते तीं फाडून शरीररचनेची माहिती करून घेतात. येथील ज्या जागेमध्यें प्रेतें फाडतात तीस डिसेक्शन हॉल म्हणतात. ही जागा अति घाण असेल व तेथें दुर्गंधि असह्य येत असेल, असें सर्वांस वाटत असेल; व तसें वाटणें स्वाभाविक आहे. निदान, मी पुण्यास सासून इस्पितळांतील प्रेतें फाडण्याची जागा मागें पाहिली होती त्यावरून माझी तशी समजूत होती; पण ती समजूत येथें अगदीं खोटी ठरली. हें ठिकाण इतकें स्वच्छ राखलें आहे कीं, तें पाहून अत्याश्चर्य वाटलें. प्रेतें फाडण्यापूर्वी त्यांचे हृदयांत सोमल, कॅर्बालिक आसिड व पारा यांच्या मिश्रणाची पिचकारी मारतात; त्यामुळें तें कुज-

---

* कॉलेजांतील हत्यारें व अन्य उपकरणें यांवर खर्च ३ लाखांहून जास्त झाला असेल.

ण्याची क्रिया बंद होते. जो भाग कापला असेल त्याच्यावर पा· ण्याची तोटी सोडून तो खूप धुतात. इतकें केलें म्हणजे मुळींच घाण येत नाहीं. फाडतांना प्रेतें ठवण्याला कांचेचीं टेबलें आहेत. कांचेला लाकडाच फळयाप्रमाणें बारीक खाचखळगे नसल्यामुळें घाण राहण्याला व ती कुजण्याला जागाच नाहीं. टेबलें पाण्यानें धुतलीं कीं, तीं अगदीं स्वच्छ होतात. या हॉलमध्यें सुमारें ३० टेबलें आहेत. प्रत्येक टेबलाजवळ सुमारें ४।५ विद्यार्थी टेबलावरील प्रेत फाडून शारीर शास्त्राचा अभ्यास करीत होते. एका कांचेच्या टेबलास १॥ शें रुपये पडतात असें समजलें.

येथील विद्यार्थ्यांना ज्या दिवसांत इंद्रियविज्ञानशास्त्र म्हणजे इंद्रियांचें कार्य अथवा काम याचें शास्त्र शिकविण्यास आरंभ करतात त्या दिवसांत फाडून पाहाण्यासाठीं विद्यार्थ्यांना रोज ४० बेडूक द्यावे लागतात. इतक्या बेडकांचा रोज पुरवठा व्हावा म्हणून बेडकांची पैदास करण्यासाठीं एक तळें राखून ठेविलें आहे !

जे. जे. हॉस्पिटलमध्यें रोग्यांची व्यवस्था एकंदरीनें इतकी चांगली असते कीं, तशी पुष्कळ लोकांचे स्वतःचे घरीं देखील राहात नाहीं. येथें एक मुलांसाठीं इस्पितळ आहे. त्यांतील मुलांना खेळणीं विकत घेऊन देतां यावीं म्हणून एक फंडही आहे !

सरकारनें ज्या लोकोपयोगी व प्रचंड अशा संस्था निर्माण केल्या आहेत, त्यांमध्यें ही प्रमुख आहे. येथें किती उपयोगी शिक्षण मिळतें व येथें हजारों गरीब रोग्यांसही किती उत्तम प्रकारचें औषधपाणी मिळतें, याचा विचार केला म्हणजे या संस्थेबद्दल व ती स्थापन करणाऱ्या व्यक्तींबद्दल फार आदर व कृतज्ञता हीं उत्पन्न होतात. ही संस्था मुंबई शहराचें एक अत्युत्तम भूषण आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## आंधळ्यांची शाळा.

नंतर आम्ही नाडदेव रस्त्यावरील आंधळ्यांची शाळा पाहाण्यास गेलों. त्या शाळेवरील मुख्य शिक्षक एल्. एम्. अँड् एस्. म्हणजे डाक्टरीची परीक्षा पास झालेले आहेत. परीक्षा पास झाल्यावर दुर्दैवानें त्यांची दृष्टि गेली. नंतर ते आंधळ्यांची लिपी वाचावयास शिकले ही लिपी अशी असते कीं, जाड कागदास :: अशी सहा जागांवर एकपासून सहांपर्यंत भोंकें पाडलेलीं असतात, व भोंकांवर बोट ठेविलें म्हणजे ती भोंवें हातास लागून भोंकांचें स्थान व त्यांची संख्या यांवरून अक्षरांचें ज्ञान होतें. येथें गरीब आंधळ्या मुलांची मोफत जेवण्याची व राहाण्याची सोय असून त्यांना लिहिणेंवाचणें, सोपें अंकगणित इत्यादि विषय शिकवून शिवाय शिवणें, पेटी वाजविणें खुर्च्यांची वेताची बैठक विणणें वगैरे उपयोगी कला शिकवितात. यामुळें त्यांना धंदा करून पोट भरण्याचें सामर्थ्य येतें. या शाळेंत शिकून तयार झालेलीं कित्येक मुलें मुंबईत महिना ९०।६० रुपयांपर्यंत पगारही मिळवीत आहेत. येथें एक गोष्ट पाहून आम्हांला विशेष चमत्कार वाटला ती ही कीं, येथील



**आंधळ्यांच्या शाळेवरील प्रिन्सिपाल(मुख्य शिक्षक.)**

आंधळे विद्यार्थी सुईत दोरा स्वतःच ओंवतात.

हें आम्हांस कोणीं सांगितलें असतें तर खरें वाटलें नसतें. दोरा ओंवण्याची त्यांची रीत पुढीलप्रमाणें दिसली. प्रथम दोऱ्याचे टोंकास

पीळ घालून टोंक बारीक व ताठ करावयाचें. नंतर एका हाताचे चिमटींत सुईचें नेढें ( भोंक असलेलें टोंक ) हलकेंच दाबून धरावयाचें; म्हणजे भोंक कोठें आहे तें समजतें. मग दुसऱ्या हातानें दोऱ्याचें टोंक नेढें ( सुईचें भोंक किंवा डोळा ) असलेल्या ठिकाणीं सारावयाचें कीं झालें. ज्यास संवय नाहीं अशा डोळस मनुष्यापेक्षांही थोड्या वेळांत हीं आंधळीं मुलें सुईंत दोरा ओंवतात, ही विशेष आश्चर्याची गोष्ट नाहीं असें कोण म्हणेल ?

माझ्या वाचकांपैकीं कोणीं आपल्या गांवीं गरिबाचें आंधळें मूल पाहिल्यास तें या शाळेंत पाठविण्याविषयीं त्यांनीं त्याच्या आईबापास किंवा पालकास सांगावें;म्हणजे त्या बिचाऱ्याचे लोकांपुढें केविलवाण्या मुद्रेनें भीक मागण्याचे हाल चुकाविल्याचें पुण्य त्यांना मिळेल.

## टांकसाळ.

चौथ्या दिवशीं आम्ही टांकसाळ पाहाण्यास गेलों. टांकसाळींत रोज ७॥ लाखपर्यंत नाणीं निघतात. येथें चांदीचीं व निकेलचीं नाणीं तयार होतात. एका वेळेस सुमारें ६॥ मण चांदीचे पाटे यंत्रांत घालून त्यांचा, रुपयाच्या जाडीचा पत्रा, तयार करतात; व मग यंत्राच्या साहाय्यानें त्याचे तुकडे पाडून रुपये तयार करतात. रुपयावर छाप उठविणें, बाजूस कंगोरे पाडणें वगैरे सर्व कामें यंत्रानें होतात व तीं अति जलद होतात. उदाहरणार्थ--रुपयास कंगोरा पाडणाऱ्या यंत्रानें एका मिनिटांत ८ शें रुपयांस कंगोरे पाडले जातात. मुखवट्याचा छाप मारणाऱ्या यंत्रानें एका मिनिटांत १३० रुपयांवर छाप मारला जातो. येथील यंत्रांनीं जीं कामें होतात तीं पाहून फार आश्चर्य वाटतें. रुपयाच्या पत्र्याचे वाटोळे तुकडे पाडल्यावर एकादा तुकडा वज-

नानें कमी असला तर त्यास यंत्र एकीकडे काढून टाकतें! नाणीं मोजून त्यांच्या नियमित संख्येच्या चवडी करणें हीं कामेंही यंत्रानें होतात. येथील ताजवे इतके उत्तम आहेत कीं, वजनांत १ गुंजेचा फरक असला तरी तो समजून येतो. ह्या जातीच्या एकेका ताजव्यास ६ शें रुपये किंमत पडते. दुसरा एक ताजवा आहे त्यांत २५ हजार रुपये एकदम बरोबर तोलतां येतात. पंचवीस हजार रुपयांवर एक रुपया राहूंद्या पण एक पावली टाकली तरी ती वजनावरून कळून येते!

## टाउनहॉल व रॉ. ए. सो. ची लायब्ररी आणि म्युझीयम.

नंतर आम्ही शेजारचा टाउनहॉल व त्यांतील रॉयल एशियाटिक सोसायटीची लायब्ररी पाहाण्यास गेलों. या टाउन हॉलमध्यें एक प्रचंड ऑर्गन—बाजाची पेटी—आहे. हिची लांबी व उंची ही एकाद्या लहानशा दिवाणखान्याएवढी आहे. हीस सुमारें २० हजार रुपये खर्च आला असें म्हणतात.

रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथसंग्रहालयांत १ लाखावर पुस्तकें आहेत. या लायब्ररीची वर्षाची वर्गणी ५० रुपये आहे. येथें जवळच रॉयल एशियाटिक सोसायटीची म्युझीयम (पदार्थ-संग्रहालय) आहे. या म्युझीयममध्यें जुन्या मूर्ति, शिलालेख, शिल्पकामाचे नमुने इत्यादिकांचा मोठा संग्रह केला आहे. या कामीं आजपर्यंत १२ लक्षांवर खर्च झाला आहे.

## डॉकयार्ड फॅक्टरी.

टाउन हॉलपासून आम्ही शेजारच्या डॉकयार्ड फॅक्टरींत

गेलों. येथें आगबोटी व होडचा यांच्या दुरुस्तीचें काम चालतें. यांतील नौकरांची संख्या हजारावर आहे. येथें जी अनेक यंत्रें आहेत, त्यांत वाफेनें चालणारा हातोडा पाहण्यासारखा आहे. याची जाडी सुमारें फूट असून याचें सामर्थ्य शेंकडों खंडी आहे. म्हणजे शेंकडों खंडी वजनाचा लोखंडी घन जोरानें आपटला असतां त्याचा जेवढा दाब पडेल तेवढा ह्याचा पडतो. ह्याच्याखालीं मोठ्या मनुष्या-च्या मांडीएवढी लोखंडाची लाट तापवून लाल करून ठेविली तर २।३ मिनिटांत चपटी होऊन जाते. येथील वाफेनें चालणाऱ्या पोलादी कातऱ्याही अशाच जंगी आहेत. तळहाताच्या जाडीचे लोखंडाचे पत्रे या कातऱ्यांनीं सहज कापले जातात!

नंतर आम्हीं

## अपॉलो बंदर व शेजारचें ताजमहाल हॉटेल


पाहिलें. हें भव्य हॉटेल मुंबईतच नव्हे तर सर्व हिंदुस्तानांत पहिल्या नंबरचें आहे. हें मुंबईचे प्रख्यात पारशी कोटचधीश टाटा यांनीं बांधिलें. ह्यास २५ लाखांवर खर्च झाला आहे. यामध्यें ४ शें लोकांची राहाण्याची व जेवणाची सोय होतें. प्रत्येक माणशीं रोजचा खर्च १० पासून २० रुपयांपर्यंत घेतात!

येथून आम्ही

## राजाबाई टॉवर

पाहाण्यास गेलों. हा मनोरा फार भव्य व उंच आहे. या मनो-ऱ्याची उंची ५० पुरुष म्हणजे अतिशय उंच देवळाच्या शिख-राच्या निदान दुप्पट आहे. या मनोऱ्यावरून भोंवतालचा मुंबई

शहराचा देखावा अप्रतिम दिसतो. या मनोऱ्यावरील प्रचंड घड्याळ प्रेक्षणीय आहे. त्याचा कांटा माणसाइतका लांब आहे, व त्याच्या



राजाबाई टॉवर.


घंटा माणसाच्या कमरेपेक्षां जास्त उंचीच्या आहेत. सगळ्यांत मोठ्या घंटेचें वजन ९ खंडी आहे. ह्या घड्याळास वीस हजार रुपये खर्च आला.

## कुलाब्याची दांडी.

संध्याकाळीं आम्हीं कुलाब्याची दांडी अथवा लाइट-हाउस (दीपस्तंभ) पाहिलें. हें बांधण्यास सुमारें ९ लाख खर्च आला. यांत फिरणाऱ्या दिव्याच्या कांचेच्या अष्टपैलू घराचा व्यास सुमारें वांवभर असून प्रत्येक बाजूची कांच तळहातापेक्षांही जाड आहे. प्रत्येक बाजूच्या कांचांतील मधली कांच सूक्ष्मदर्शक भिंगासारखी फुगीर ( अर्थात् पदार्थ असतो त्यापेक्षां मोठा दाखविणारी) आहे. यामुळें हें घर दिव्याभोंवतीं फिरतांना प्रत्येक बाजूची मधली फुगीर कांच दिव्याकडे पाहाणाऱ्या मनुष्याच्या समोर येते तेव्हां दिवा एकदम मोठा दिसतो. समुद्राचे पाण्याखालीं असलेल्या खडकाची इशारत देण्याकरितां हे दीपस्तंभ बांधलेले असतात. साधा दिवा लांबून आकाशांतील एखाद्या ताऱ्याप्रमाणें दिसतो. म्हणून, दिसणारा प्रकाश ताऱ्याचा नसून दीपस्तंभांतील दिवाच आहे हें खलाशास समजावें यास्तव दिवा लहान मोठा होण्याची योजना केली आहे.

## प्रिन्सेस डॉक्स.

पांचव्या दिवशीं आम्ही प्रिन्सेस डॉक्स नांवाची मुंबईची मुख्य गोदी पाहाण्यास गेलों. डॉकजवळ गेल्यावर जो देखावा दृष्टीस पडला तो पाहून मी फार आश्चर्यचकित होऊन गेलों. जिकडे पाहावें तिकडे आगबोटी, खलाशी, मालांचे गठ्ठे व माल नेणाऱ्या गाड्या, ह्यांची गर्दीच गर्दी. सर्व देखावा अपूर्व तर होताच, पण त्यांत त्या प्रचंड आगबोटी, त्यांचीं राक्षसी धुराडीं ( चिमण्या ), त्यांच्या आकाशास टेकल्याप्रमाणें दिसणाऱ्या डोलकाठ्या व कांहीं आगबोटींवरील वायरलेस ( बिनतारेच्या ) तारायंत्रासंबंधाचीं तारांचीं जाळीं हीं पाहून मन कौतुकानें व आश्चर्यानें अगदीं गुंग




प्रिन्सेस डॉक्समधील पोत्यांचा ढीग.

होऊन गेलें केवढें हें मनुष्याचें सामर्थ्य कीं, त्यानें ह्या प्रचंड आग-बोटी व बिनतारी तारायंत्र यांच्या साहाय्यानें खंडाखंडामध्यें हजारों योजनें पसरलेल्या महासागरास जणू काय नाहींसें करून टाकलें आहे. कोठें अमेरिका आणि कोठें आशिया खंड, पण आगबोटी व बिनतारी तारायंत्र यांच्या योगानें हीं दोन्ही खंडें जणू काय एकमेकांशेजारीं आणून ठेवलीं आहेत !

मुंबईच्या गोदींत जगांतील बहुतेक राष्ट्रांतून आलेल्या आगबोटी

वर्षांतून दृष्टीस पडतात. आम्ही गेलों होतों तेव्हां फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया, इटली, जपान या देशांहून आगबोटी गोदींत आल्या होत्या, व त्या त्या आगबोटींवरील भिन्न जातींचे खलाशी आमच्या दृष्टीस पडले. आगबोटींवर माल चढविण्याकरितां व तिच्यांतील माल उतरविण्याकरितां येथें वाफेनें चालणाऱ्या प्रचंड यान्यांची योजना केलेली असते. या याऱ्यांच्या साह्यानें दहा पांच पोतीं सहज उचललीं जातात, एवढेंच नव्हे तर हत्तीसारखा प्रचंड प्राणीही



यारीनें उचलला जाणारा हत्ती.

उचलला जातो. गळास लागलेला मासा कोळी जसा लीलेनें उचलतो तशी ही यारी गजराजास लीलेनें उचलिते व आगबोटींत फेंकून देते. जवळच्या वखारींतून मालाचे ढीगच्या ढीग पडले होते. पोत्यांच्या राशी तर एवढ्या मोठ्या होत्या, कीं त्यांना पोत्यांच्या किंवा गठ्ठ्यांच्या लहानशा टेकड्या म्हटलें तरी चालेल !

मुंबईशहराच्या ऐश्वर्याचें खरें मूळ

या गोद्यांतील वखारीच होत. येथें जो व्यापार चालतो त्यामुळें

मुंबईशहरांतील लोकांना संपत्ति मिळते. या व्यापारावर मुंबईचे व्यापारी दरवर्षीं लाखों रुपये मिळवितात. व्यापारांत किती संपत्ति मिळते हें मुंबईतील परोपकारक व धमार्थ संस्था व त्यांना मुंबईच्या व्यापाऱ्यांनीं दिलेल्या देणग्या, यांपैकीं कांहींसंबंधानें पुढें दिलेल्या माहितीवरून चांगलें ध्यानांत येईल.

## मुंबईतील मुख्य मुख्य संस्थांच्या संख्या–

अनाथगृहें १०, अनाथविद्यार्थीगृहें १०–१५, मोफत इस्पितळें २०, सामाजिक संस्था अथवा समाजोपयोगी संस्था ३०.

| मुख्य धमार्थ फंड किंवा संस्था यांचीं नांवें. | फंडाची रकम. |
|---|---|
| पार्शी इस्पितळ | २० लाख |
| बी. जे. पार्शी धर्मार्थ संस्था | ६। लाख |
| पेटिट धर्मार्थ फंड | २५ ,, |
| पार्शी पंचायत फंड | ६० ,, |

कावसजी जहांगीर रेडिमनी या पार्शी गृहस्थांच्या दानधर्मांतील ठळक रकमाः—

६६००० रुपये सुरत येथील इस्पितळासाठीं.
५५००० ,, एंजिनिअरिंग कॉलेजसाठीं.
९७००० ,, मुंबईतील डोळ्यांचे रोगांचे इस्पितळासाठीं.
५०००० ,, सिंध-हैदराबाद येथील वेड्यांचे इस्पितळासाठीं.
१०२००० ,, युनिव्हर्सिटी हॉल बांधण्यासाठीं.
२००००० ,, एलिफन्स्टन कॉलेजसाठीं.

एकंदर धर्म १७ लाख रुपये.

सर जमशेटजी जिजीभाई यांचा एकंदर धर्म २५ लाख.

जे. एन. टाटा यांच्या देणग्याः—३० लाख बंगलोर रिसर्च इन्स्टिटयूट; एकंदर धर्म सुमारें १ कोट.



जे. एन. टाटा.

मनुष्य उद्योग व गुण यांच्या साहाय्यानें ऐश्वर्यवान् कसा होतो याचें पार्शी लोक हें उत्तम उदाहरण आहे. त्यांना स्वतःचा स्वतंत्र देश नाहीं, राज्य नाहीं, पण ह्यांच्याइतकी भरभराट फारच थोड्या लोकांची आहे. पार्शी लोकांत कोणी भीक मागण्याचा धंदा करीत नाहीं असें म्हणतात. गरीब पार्शी मुलांच्या विद्येची सोय व्हावी, गरीब पार्शी लोकांना फुकट औषधपाणी मिळावें व म्हाताऱ्या आणि आंधळ्या पांगळ्या पार्शी लोकांना फुकट अन्न मिळावें यासाठीं मुंबईशहरांत पार्शी लोकांनीं अनेक सोई करून ठेविल्या आहेत. याचें कारण पार्शी लोकांची संपत्ति व त्यांची आपल्या जातीच्या लोकांविषयीं कळकळ हें होय. त्यांच्या संपत्तीचें कारण अर्थात् त्यांचा उद्योगी, धाडसी व उत्साही स्वभाव जें काम पार्शी हातांत घेतो त्यांत तो बहुधा यश मिळवितो. वकीली, डॉक्टरी, कारखानदारी, व्यापार, कंत्राटानें कामें घेणें, यांत पार्शी यशस्वी

होतोच, पण शेतीमध्यें पडूनही तो ती फायदेशीर करून दाखवितो. पार्शीमध्यें व्यवहारचातुर्य आहे. त्याचप्रमाणें दानधर्म, सार्वजनिक कामांविषयीं कळकळ, कर्तव्यतत्परता, इत्यादि गुण आहेत. पार्शीचा दानधर्म तर सुप्रसिद्धच आहे. खंडाळवाला, खारेघाट यांसारखे कर्तव्यतत्पर अधिकारी व वाच्छा, फेरोजशहा मेथा, टाटा, दादाभाई नौरोजी यांसारखे सार्वजनिक हिताचीं कामें करणारे लोक, याचें प्रमाण, ज्यांची सर्व लोकसंख्या एक लाखाहून कमी आहे अशा, पार्शी लोकांत जें आहे तें दुसऱ्या जातींत क्वचित् आढळेल. व्यापारांतील धाडस व कौशल्य यांसंबंधानें भाटे, खोजे, बोहरी लोकही बरेच प्रसिद्ध आहेत. दानशूरपणाविषयीं भाट्यांची फार ख्याति आहे.

या सर्व लोकांतील सद्गुणांचें अनुकरण इतर जातींनीं करण्यासारखें आहे.

## इतर पाहण्यासारख्या गोष्टी.

वरील शिवाय पुढील इमारती व संस्था आम्हीं पाहिल्याः—

/ क्राफर्डमार्केट, कुलाबा ऑबझर्व्हेटरी, बॉंबे आर्ट सोसायटी, जी. आय. पी. व बी. बी. सी. आय रेल्वेचीं ऑफिसें, हायकोर्ट, सेक्रेटरीएट, जनरल पोस्टऑफिस, एल्फिन्स्टन हायस्कूल, एल्फिन्स्टन कॉलेज व इतर कॉलेजें आणि शाळा—विशेषतः कोटांतील न्यू हायस्कूल, ख्रिस्तिप्रार्थनामंदिरें ( चर्चेस ), टाटा मॅन्शन ( प्रसिद्ध पार्शी व्यापारी टाटा यांचा बंगला ), वाळकेश्वर, बाबुलजी, भुलेश्वर, माधवबाग, जुम्मामशीद, म्युनिसिपल ऑफिस इ०. कुलाबा ऑबझर्व्हेटरींतील गुणाकार भागाकार करणारें यंत्र पाहण्याजोगें आहे.

## मुंबईचा अलौकिकपणा.

मुंबईशहर हें हिंदुस्तानांत कलकत्त्याच्या खालोखाल संपत्तिमान

शहर तर आहेच; पण जगांतील संपत्तिमान् शहरांतही त्याची गणना होण्याजोगी आहे. या शहरांत जिकडे पाहावें तिकडे राजमंदिराप्रमाणें भव्य इमारती दिसतात, व रस्त्यांतून सुंदर गाड्या व मोटारी यांची सारखी रहदारी दिसते. गाड्यांचे घोडे तर एकाहून एक चित्रासारखे असे सुंदर दिसतात कीं, त्यांच्याकडे टक लावून पाहावेंसें वाटतें. माणसांचे पोशाकही एकाहून एक मूल्यवान् व भपकेदार असतात. एकाद्या संस्थानिकाच्या राजवाड्यांतील दिवाणखान्याप्रमाणें सुशोभित अशीं दुकानें मुंबईस शेंकडों आहेत. उत्पन्नावर इन्कमटॅक्स म्हणून जो कर आहे त्यासंबंधाच्या सरकारी कागदांवरून असें कळून येतें कीं, ज्यांचें वर्षाचें उत्पन्न दोन हजारांपासून लाखापर्यंत आहे असे सुमारें ७ हजार लोक मुंबईंत आहेत, व ज्यांचें उत्पन्न दरवर्षीं लाखावर आहे असे सुमारें पाउणशें लोक आहेत.यांपैकीं ७ हिंदू, ६ पार्शी, ४ मुसलमान, व बाकींचे युरोपियन आहेत. या युरोपियनांपैकीं कांहीं बॅरिस्टर व कांहीं सरकारी नौकर असून बाकीचे व्यापारी आहेत. मुंबईच्या लोकांच्या उत्पन्नाचें मुख्य साधन व्यापार होय. मुंबई बंदरांत लाखों नव्हे तर कोट्यवधि रुपयांचा माल येतो. असा माल परदेशाहून आणावयाचा, किंवा बंदरांत अ लेला माल खरेदी क.रावयाचा व तो इतर व्यापाऱ्यांस नफ्यानें विकावयाचा हा येथील मोठ्या व्यापाऱ्यांचा मुख्य धंदा आहे गिरण्या व मोठीं दुकानें काढणें हीं ही संपत्ति मिळविण्याचीं साधनें आहेत.कांहीं दुकानदार लक्षाधीश आहेत तर कांहीं गिरणीवाले कोट्यधीशही आहेत.

## उपसंहार.

याप्रमाणें ७।८ दिवस आम्हीं मुंबईशहर पाहाण्यांत फार मजेंत घालविले. हें शहर पाहाण्यापासून अतिशय करमणूक तर होतेच,

पण फार महत्त्वाचा बोधही होतो. देशाचा फायदा होण्यास व लोक संपत्तिमान् होण्यास व्यापार व कारखाने यांची किती आवश्यकता आहे हें येथें मनांत फार चांगलें ठसतें. मुंबईशहराचे जागीं पूर्वीं थोड्याशा कोळ्यांची वस्ती होती असें सांगतात; पण व्यापाराचे कामीं बंदराचा उपयोग होऊं लागल्यापासून ह्या शहराची वाढ होऊं लागली व आतां हें शहर सौंदर्य व संपत्ति या बाबतींत हिंदुस्तानांत जवळजवळ पहिल्या नंबरचें बनलें आहे. येथील लोकांची महत्त्वाकांक्षा व अवाढव्य उद्योग हीं पाहून कोणाही पाणीदार मनुष्याचे मनांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाल्याशिवाय राहाणार नाहीं. तशी माझ्या वाचकांपैकीं कांहींच्या तरी मनांत होवो.

## मुंबईंत टाळावयाच्या गोष्टी.

मोठ्या शहरांत चांगल्या गोष्टी असतात त्याप्रमाणें वाईटही असतात. ह्या वाईट गोष्टी म्हणजे चैनीचीं साधनें व लबाड किंवा फुस लावणारे लोक. यासंबंधानें नवीन मनुष्यानें फार जपलें पाहिजे. भामटयांसंबंधानें मुंबईची ख्याति आहे. आमच्या ओळखीच्या एका तरुण गृहस्थास एका भामटयानें फसविलें त्याची हकीकत त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितली. "मी मुंबईस श्रीमंत....करितां सामान खरेदी करण्यास जात होतों. गाडींत एका मनुष्यानें माझ्याशीं भाषण सुरू केलें व मला जिकडे जावयाचें होतें तिकडे आपणासही जावयाचें आहे असें सांगितलें. मी बोरीबंदरावर उतरून सरदारगृहाकडे जाऊं लागलों तसा तोही मजबरोबर येऊं लागला. वाटेंत आमच्या जवळून एक व्हिक्टोरिया गेली व ती कोपऱ्यावर एका रस्त्याकडे वळली. त्या गाडींतून कायसा जिन्नस खालीं पडला असें मला माझ्या बरोबरच्या गृहस्थानें सांगितलें व मला तो तिकडे घेऊन गेला. पाहातों तों एका कागदाची मोठीशी पुडी पडलेली आढळली. ती

उघडून पाहातां तींत सोन्याची चीप दिसली. इतक्यांत कोणी माणसें आपणाकडे येतांना पाहिलेसें करून ती पुडी त्यानें खिशांत टाकली व मला हातांत धरून माझ्याशीं दुसऱ्याच गप्पा मारीत तो पुढें जाऊं लागला. तीं माणसें जवळ आलीं व त्यांनीं त्या गृहस्थास 'आमच्या शेटाची गाडी आतां इकडून गेली तिच्यांतून त्यांची सोन्याची चीप खालीं पडली आहे, ती तुम्हांस सांपडली आहे काय,' म्हणून विचारिलें पण त्यानें 'नाहीं' म्हणून उत्तर दिलें. पुढें थोडें अंतर गेल्यावर मागें वळून पाहून तो मला म्हणाला 'मागून पोलीस शिपाई व कांहीं माणसें तपासासाठीं येत आहेत त्यांची कांहीं तरी व्यवस्था लावली पाहिजे, करितां मला तुमच्या जवळचे कांहीं रुपये द्या.' 'मला ही तुझी भानगड नको, मी जातों.' असें मी म्हणालों, पण त्यानें तें न ऐकतां माझ्या खिशांतलें पाकीट चटदिशीं काढून घेतलें ( मी सामान खरेदी करण्यास जात आहें हें त्यानें मजकडून काढून घेतलें होतें व माझें पाकीट दिसण्यासारखें खिशांत होतें ) व 'तुम्ही घाबरूं नका. मी तुमचे पैसे आतां परत देतों, ही घ्या चीप तुमच्याजवळ' असें म्हणून त्यानें चीप माझ्या खिशांत टाकली. नंतर तो म्हणाला 'पायधुणीवर अमुक खुणेच्या जागीं माझी पेढी आहे तेथें जाऊन बसा, मी या माणसांची व्यवस्था करून येतों.' हा प्रकार पाहून मी थोडा भयभीत झालों होतों व आपण या संकटांत सापडूं या भीतीनें मी मुकाट्यानें पायधुणीवर गेलों. तेथें त्यानें सांगितलेल्या खुणेप्रमाणें पेढीचा तपास केला पण ती सांपडली नाहीं. तेथें सुमारें १ तास वाट पाहिली पण तो गृहस्थ आला नाहीं. न जाणो आपल्या मागोमाग तपास करीत चिपेच्या मालकाचा कोणी मनुष्य आल्यास आपण मुद्देमालासह सांपडूं या भीतीनें तेथें उभें न राहातां निघून जावें असा मीं निश्चय केला व माझ्या ओळखीचे फोर्टमध्यें एक व्यापारी

होते त्यांचेकडे थेट गेलों आणि त्यांना सर्व हकीकत सांगितली. चीप पाहातांच 'तुम्हांस मुंबईच्या भामटयानें फसविलें' असें ते म्हणाले व त्यांनीं एक पटाशी आणून ती चीप कापली, तों ती आंतून तांब्याची असून तिला वरून सोन्याचा मुलामा दिला होता असें दिसलें. झालें; तोंडांत मारल्यासारखा मी खजील झालों."

फसवेगिरीचे असे अनेक प्रकार आहेत. यासंबंधानें एक नियम लक्षांत ठेवला म्हणजे मुंबईस जाणाऱ्या इसमावर पश्चात्तापाचा प्रसंग येणार नाहीं. तो नियम हा कीं, **मुंबईस अपरिचित माणसानें बोलाविल्यास त्याचेबरोबर जाऊं नये व त्याशीं कोणताही व्यवहार करूं नये.** 'तुम्हास अमुक गंमत दाखवितों' असें म्हणून बोलावणारे पुष्कळ लबाड लोक असतात त्यांच्याकडे बिलकूल लक्ष देऊं नये.

मुंबईस पुढील बाबतींतही खबरदारी ठेवावी:—

रस्त्यांतून जिन्नस विकत हिंडणारे मुसलमान व्यापारी, तसेच लहानसान मुसलमान दुकानदार यांचेकडे जिन्नस विकत घेण्यास जाऊं नये. हे भलतीच किंमत सांगतात व फसवितात. बरें आपण योग्य किंमतीला जिन्नस मागितला तर 'ज्या ज्या; ( म्हणजे,जा जा ) मोठा घ्यायला आला....'अशा प्रकारची हलकट भाषा वापरतात. यास्तव मोठीं किंवा प्रसिद्ध दुकानें यांवाचून इतर दुकानांत, बरोबर मुंबईचा माहीतगार मनुष्य असल्यावाचून, जाऊं नये.

मुंबईस पोशाकही होतां होईलतों पुण्यामुंबईच्या थाटाचा करावा. वेडावांकडा रुमाल किंवा वेडेंवाकडें उपरणें पाहून हा मनुष्य परगांवचा व अर्थात् खेडेगांवचा आहे असें समजून कधीं कधीं परजातीय लोक व दुकानदार थट्टा करतात किंवा फसविण्याचा यत्न करतात.

**मुंबई पाहाण्यास जाणाऱ्या लोकांनीं लक्षांत ठेवावयाच्या इतर गोष्टी**:—कोठें उतरावयाचें याबद्दल पूर्वी ठरवावें व ज्याकडे उतरावयाचें त्याचेकडे जागेची सोय आहे कीं नाहीं याबद्दल अगोदर चौकशी करावी. राहाण्याची जागा मुंबईस फार महाग असल्यामुळें एकाद्याकडे उतरण्यास पुरेशी जागा असेल असें समजून चालूं नये. ज्यांना रोज माणशीं १॥—२ रुपये देण्याची ऐपत असेल त्यांनीं सरदारगृहासारख्या ठिकाणीं पूर्वीं लिहून तेथें उतरण्याची व्यवस्था करावी.

गिरगांवांत उतरावयाचें असेल तर सोईप्रमाणें पुढीलपैकीं एकादी व्यवस्था करावी:—

( १ ) दादर स्टेशनवर उतरून, बी. बी. सी. आय् रेल्वेच्या लोकल ट्रेननें चर्नीरोड स्टेशनवर उतरावें.

( २ ) जास्त पैसे खर्च करून व्हिक्टोरिया करून आरामानें जाणें असेल, तर बोरीबंदरावर उतरून व्हिक्टोरियांतून जावें.

( ३ ) ट्रामनें जाणें असेल तर भायखळ्यास उतरून ट्रामनें जावें. बोरीबंदर स्टेशनवर ट्राम भरून येत असल्यामुळें तेथें जागा मिळण्यास अडचण पडते. भायखळ्याला तशी अडचण पडत नाहीं.

मुंबईस व कोठेंही, गाडीनें डाव्याबाजूनें जावयाचें असा नियम आहे. म्हणून रस्त्यानें चालणाऱ्या माणसांनीं रस्त्याच्या उजव्या बाजूनें जावें. तसें केल्यानें गाडी मागून येऊन तिचा धक्का बसण्याची भीति राहात नाहीं.

आगगाडीही वरील नियमाप्रमाणें जाते. म्हणून आपणांस ज्या दिशेनें जावयाचें असेल तिकडे तोंड केलें असतां डाव्या बाजूकडील रुळावर आपली गाडी उभी रहावयाची असें समजावें व त्याप्रमाणें तिकडील प्लॅटफॉर्मवर उभें रहावें.

जें ठिकाण पाहावयाचें असतें तें नेहमीं उघडें असणारें असें नसेल तर त्याचे चालकास पूर्वीं लिहून तें उघडें असेल त्या दिवशीं जाण्याची व्यवस्था करावी. नाहींतर उगीच हेलपाटा पडण्याची भीति आहे. अशीं ठिकाणें पुढील होत. ह्या संस्था पाहाण्यास कोणासही परवानगी मिळते. तथापि पूर्वीं पत्र लिहून तारीख व सोईची वेळ विचारून घ्यावी हें बरें.

| संस्थेचें नांव. | ज्या अधिकाऱ्याकडे अर्ज करावयाचा त्याचें नांव. |
|---|---|
| टांकसाळ .... .... | मिंट—मास्टर. |
| डॉकयार्ड फॅक्टरी .... .... | सुपरिंटेंडेंट. |
| कुलाब्याची दांडी .... .... | |
| टाटा मॅन्शन .... .... | मॅनेजर, टाटाकंपनी. |
| परेळ लेबॉरेटरी .... .... | सुपरिंटेंडेंट. |
| ताडदेव रस्त्यावरील आंधळ्यांची शाळा .... .... | प्रिन्सिपाल. |
| कुलाबा—ऑबझर्व्हेटरी .... .... | डिरेक्टर. |

राणीच्या बागेंतील म्युझीयम अथवा अजबखाना बुधवारशिवाय इतर दिवशीं सकाळीं व तिसऱ्या प्रहरीं सुमारें तीन तीन तास खुला असतो. सार्वजनिक सणाचे दिवशीं अजबखाना सकाळीं उघडा न ठेवतां ११ वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत उघडा ठेवतात.

2070